ह.प्र.नि.अ कक्ष
दि. २०.४.२००११

कार्यालयीन टिप्पणी :

विषय : यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधुन कोळसा व इतर खनिजे यांची वाहतुकीबाबत मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०४.२०११ रोजी दुपारी ०२.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधून (**Mechanical Operated Closed Trucks**) कोळसा व इतर खनिजे वाहतुक करण्यासाठी मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०४.२०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे प्रारुप इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर

वि. मो. मोटघरे
(ह.प्र.नि.अ.)

सदस्य सचिव : सदस्य सचिव निदर्शक यांच्याकडे ... E mail द्वारे इतिवृत्त ... केले आहे.

मा. अध्यक्षा / सचिव, पर्यावरण :

APPE
Pl. circulate to all

Baijal/Pushar

यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधुन कोळसा व इतर खनिजे यांची वाहतुकीबाबत मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०४.२०११ रोजी दुपारी ०२.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधून (Mechanical Operated Closed Trucks) कोळसा व इतर खनिजे वाहतुक करण्यासाठी मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.०४.२०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री,पर्यावरण, महाराष्ट्र राज्य, मा.सचिव, पर्यावरण विभाग, म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव, महाव्यवस्थापकीय संचालक, महाजेनको, तसेच म.प्र.नि.मंडळाचे संबंधित अधिकारी, तसेच वेस्टर्न कोल लि. व मँगनीज ओअर इंडिया लि., चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीची प्रस्तावना केली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महाराष्ट्रातील विविध शहरे व औद्योगिक क्षेत्रे यामध्ये वातावरणीय हवेची गुणवत्ता नियमितपणे मोजली जाते. गेल्या काही वर्षातील हवेच्या गुणवत्तेच्या आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, वातावरणीय हवेमध्ये धुळीचे प्रमाण हे मर्यादेपेक्षा मोठ्या प्रमाणावर जास्त आहे. यादृष्टीने सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच संबंधित उद्योग, खाण क्षेत्र, इ. यांना वेळोवेळी अपेक्षित उपाययोजनेबाबत सुचना दिलेल्या आहेत. वातावरणीय हवेतील धुळीच्या प्रमाणामध्ये वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा प्रमुख समावेश आहे. त्यामध्ये सुध्दा विशेषत: खाण क्षेत्र परिसरात होणाऱ्या खनिजांची वाहतुक यामुळे होणाऱ्या पर्यावरणाचे प्रश्न जसे-धुळीचे उत्सर्जन, रस्त्यांची नादुरुस्ती यांचा शेती व आरोग्यावर होणारे परिणाम, इ. हे वेळोवेळी मंडळाच्या निदर्शनास आलेले आहे. या प्रदूषणावर आळा घालण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने प्रमुख खनिज उद्योग, कोळसा, लोह खनिज, बॉक्साईट, मँगनीज, चुनखडी या खाण उद्योगांना त्यांच्या खनिजांची वाहतुक पर्यावरण पुरक पध्दतीने करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देऊन पाठपुरावा केलेला आहे. विशेषत: कोळसा क्षेत्रामध्ये कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत वेळोवेळी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत व त्या विषयी विधीमंडळात अनेकदा प्रश्न विचारले गेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन, म.प्र.नि.मंडळाने सन २००८ पासून या प्रमुख खाण उद्योगांना, संबंधित उद्योगांना खनिजांची वाहतुक यांत्रिकी बंदिस्त ट्रकमधुनच करण्याबाबत पाठपुरावा केलेला आहे. परंतु यामध्ये अत्यल्प यश लाभलेले होते व या खाण उद्योगांनी त्यांच्या खनिजांची वाहतुक अपुऱ्या टाकलेल्या ताडपत्रीच्या ट्रकमार्फत करणे अद्यापि चालु ठेवलेले आहे.

सदस्य सचिवांनी हवा प्रदुषणासंदर्भात वरील सद्यस्थिती पाहता, यंत्रचलित ट्रकमधुन कोळसा व इतर खनिजे वाहतुक करण्यासंबंधी सर्व उद्योगांच्या प्रतिनिधींना आवाहन केले, जेणेकरुन वातावरणातील हवा प्रदुषणाची पातळी कमी होण्यास, तसेच केंद्र शासनाने जाहीर केलेल्या पर्यावरण मुल्यांकन अहवालातुन चंद्रपूर जिल्हयाचे नांव वगळण्यास मदत होईल कारण महाराष्ट्रातील सर्वाधिक कोळसा व इतर खनिजांचे उत्पादन करणाऱ्या खाणी व अनुषंगाने, होणारी वाहतुक ही चंद्रपूर जिल्हयातच जास्त प्रमाणात होते. तद्नंतर सदस्य सचिवांनी बंदिस्त ट्रकमधुन कोळसा व इतर खनिजांची वाहतुकीसंदर्भात सादरीकरण केले.

..२..

तद्नंतर मा.सचिव, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य यांनी बंदिस्त ट्रकमधुन कोळसा व इतर खनिजे वाहतुक करण्याबाबत उपाययोजना सुचविणारे महाराष्ट्र हे प्रथम राज्य असून सुरुवातीस काही अडचणी येण्याची शक्यता धरुन, त्यावर मात करुन ही योजना राबविण्याबाबत सर्व उपस्थितांना आवाहन केले. महाराष्ट्र राज्याने ही योजना राबविल्यास इतर राज्येही ही योजना राबविण्याबाबत निश्चितपणे विचार करतील व पुढे सदर योजना देश पातळीवर राबविली जाईल.

यानंतर मा.सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर योजना राबविण्याकरीता उद्योगांच्या प्रतिनिधींना काही तांत्रिक अडचणी असल्यास, त्याबाबत त्यांनी त्यांचे विचार मांडण्यास अनुमती दिली.

मॉईलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री.के.जे.सिंग यांनी सदर योजनेस पाठिंबा दर्शवून ही योजना त्यांच्या सर्व खाणीतील खनिजांच्या वाहतुक करण्यासाठी राबविण्याचे आश्वासन दिले. परंतु सदर योजना राबविण्याकरीता शासनाने पुरेसा अवधी देण्याबाबतची सुचित केले.

तद्नंतर मे.हिंडाल्को इंडस्ट्रीज, मे.मरकेटर लाईन्स यांच्या प्रतिनिधींनी सदर चर्चेत भाग घेतला व योजनेस पाठिंबा दर्शवून पुरेशा कालावधीची मागणी केली. तसेच मे.मरकेटर लाईन्सचे प्रतिनिधी श्री.मल्होत्रा यांनी असे सांगितले की, त्यांच्या विदेशातही खाणी असून कोठेही यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधुन वाहतुक केली जात नाही. तसेच या प्रकारच्या ट्रकमध्ये खनिजे भरतांना व ट्रक खाली करतांना खुप त्रास होतो. अशाप्रकारची योजना राबविल्यास उद्योगांचा खर्च वाढेल (यंत्रचलित बंदिस्त ट्रककरीता) व त्याकरीता कोळसा व इतर खनिजांचाही दर वाढवावा लागेल, जेणेकरुन कोळसा व इतर खनिजे विकत घेणारे उद्योग शेजारच्या राज्यातुन सदर कोळसा व इतर खनिजांची आयात करतील व महाराष्ट्रातील खनिज उद्योगांना त्याचा फटका बसेल.

मा.सचिव, ऊर्जा, महाराष्ट्र राज्य यांनी श्री.मल्होत्रा यांचे म्हणणे खोडुन काढत सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे आपणांस हवी त्याप्रमाणे बंदिस्त ट्रक तयार करणाऱ्या कारखान्यांकडून तयार करुन घेऊ शकतो, जेणेकरुन ट्रकमध्ये खनिजे भरतांना व उरवितांना कोणताही त्रास होणार नाही. त्यामुळे आपण अशा गोष्टींचा विचार न करता उपाययोजना राबविण्याबाबत विचार करावा. त्यानंतर त्यांनी असे सुचविले की, सदर योजना लागु होण्यासाठी वेळ निश्चित करण्यात यावी. तसेच जास्त वेळ न देता एक वर्षापर्यंत सदर योजना लागु होईल, असे बघावे.

मे.वेकोलिचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री.दिनेश चंद्र गर्ग यांनी सदर योजनेस पाठिंबा दर्शवून यंत्रचलित बंदिस्त ट्रकचा आराखडा अंतिम करण्याकरीता ट्रक तयार करणाऱ्या कारखान्यांच्या प्रतिनिधींसोबतही चर्चा केल्याचे सांगितले. सदर योजना अंमलात आणण्याकरीता वेकोलि तयार असून शासनाने पुरेसा कालावधी देण्याबाबत सुचविले.

सदस्य सचिवांनी सर्वांच्या मतानुसार सर्व उद्योग प्रतिनिधी, ट्रक तयार करणाऱ्या कारखान्यांचे प्रतिनिधी व संबंधित शासकीय अधिकारी यांची मे, २०११ मध्ये बैठक घेऊन, त्या बैठकीत बंदिस्त ट्रकचा आराखडा अंतिम करण्यात येईल, तसेच याबाबत वेगवेगळया ठिकाणी जनजागृतीसाठी कार्यशाळा घेतली जाईल व प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक ०१.०४.२०१२ पासुन सुरु होईल, असे सांगितले.

..३..

शेवटी बैठकीचे अध्यक्ष, मा.मंत्री, पर्यावरण यांनी सर्व योजनेचा आढावा घेतला व प्रदुषणाची सद्यस्थिती पाहता, यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधुनच कोळसा व इतर खनिजांची वाहतुक करणे योग्य असल्याबाबत सांगितले, जेणेकरुन प्रदुषणास आळा बसेल.

सरतेशेवटी मा.मंत्री महोदयांनी सुचविले की,

१. म.प्र.नि.मंडळ, वेकोलि, मॉईल व मोठे उद्योग यांनी संयुक्तरित्या या विषयी सविस्तर कृती आराखडयासाठी कार्यशाळा घ्यावी.

२. मे, २०११ मध्ये वाहतुकदार, उद्योगांचे प्रतिनिधी संबंधित शासकीय अधिकारी व ट्रक तयार करणाऱ्या उद्योगांचे प्रतिनिधी यांची बंदिस्त ट्रकचा आराखडा अंतिम करण्यासाठी बैठक घेण्यात यावी.

३. सर्व उद्योग, खाण उद्योग, इ.नी दि.३०.०६.२०११ पर्यंत बंदिस्त ट्रकचा आराखडा (Design) निश्चित करुन म.प्र.नि.मंडळास सादर करावा.

४. अंतिम झालेला आराखडा प्रत्यक्षात लागु करण्याकरीता ३१.०३.२०१२ पर्यंतची अंतिम मुदत देण्यात यावी. या कालावधीपर्यंत उद्योगांनी सध्या विहित असलेल्या पध्दतीनुसार ट्रकवर संपुर्णपणे ताडपत्री टाकली जाईल, याची खबरदारी घ्यावी.

वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबबात मा.मंत्री, पर्यावरण यांनी निर्देश दिले.

सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर केले.

*********